**म.सं.कौ.हिं.का. अर्ज क्र. ५२/२०२४ – निशाणी २१ लगत आदेश**

ऋतुजा सुहास तोरणे वि. सुहास भुपाल तोरणे इ.

CNR No. MHSO20-002499-2024

प्रस्तुतचा अर्ज सामनेवाले क्र.४ व ५ तर्फे त्यांना म्हणणे देण्यास झालेला विलंब माफ होवुन मिळणेसाठी दाखल केलेला आहे. सामनेवाला यांचे कथनाप्रमाणे, प्रस्तुत सामनेवाले हे आजारी असल्याने त्यांना औषधोपचारासाठी जावे लागत होते. त्यामुळे प्रस्तुत सामनेवाला यांना मे. कोर्टात हजर होवून कागदपत्रे व माहिती घेवून वेळेत प्रस्तुतकामी म्हणणे देता आले नाही. त्यामुळे या सामनेवाला यांना म्हणणे देणेसाठी विलंब झालेला आहे. प्रस्तुत सामनेवाला यांनी जाणूनबुजून कोणताही विलंब केलेला नाही. तसेच सदर केसचे कामकाज ऑनमेरीट चालणेसाठी व नैसर्गिक न्याय मिळणेच्या दृष्टीने सदरकामी झालेला विलंब माफ होणे न्यायाच्या दृष्टीने आवश्यक आहे. यामुळे न्यायदानास मदतच होणार आहे. सबब सामनेवाला यांनी प्रस्तुत अर्जाद्वारे त्यांना म्हणणे देणेकामी झालेला ६ महिन्यांचा विलंब माफ करणेत यावा. अर्ज मंजूर करणेची विनंती केली.

२. अर्जदारतर्फे सदरच्या अर्जावर म्हणणे मांडले की, सदरचा अर्ज खोटा व बनावट असून सदर अर्जातील नमुद कारण हे पूर्णपणे चुकीचे व खोटे आहे. सदर सामनेवाला यांनी जाणुन बुजून म्हणणे देणेस विलंब केलेला आहे. सबब, अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली.

३. दोन्ही पक्षकारांतर्फे युक्तिवाद ऐकला. प्रकरणाचे पडताळणी केली असता सामनेवाला यांना संधी देवूनही त्यांनी त्यांचे म्हणणे मुदतीत मांडले नाही. महिलांचा घरगुती जुलूमापासून रक्षण करण्यासंबंधीचा कायदा २००५ व नियम २००६, कलम १२ वरील अर्जाची व्याप्ती पाहता तो प्रथमतः गुणदोषावर निकाली

निघणे आवश्यक आहे. अर्जाचे स्वरुप व विषय पाहता सामनेवालाला त्याचे म्हणणे मांडण्याची संधी देणे न्यायाच्या दृष्टीने आवश्यक व गरजेचे आहे. विलंबाचा कालावधी लक्षात घेता खर्च सामनेवाला क्र.४ व ५ वर ठेवणे योग्य आहे. वरील सर्व कारणांचा विचार करता खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येतो –

**<u>आ दे श</u>**

१. सामनेवाला क्र.४ व ५ यांचा अर्ज (नि.क्र.२१) त्यांनी रक्कम रु.३००/– अर्जदारास देण्याच्या अटीवर मंजूर करणेत येतो.

२. सामनेवाला यांना म्हणणे देण्यास झालेला विलंब माफ करण्यात येतो. तसेच दोन्ही पक्षकारांना अर्जाचे कामकाज विनाविलंब चालविण्याचे आदेश देण्यात येत आहे.

PRACHI RAVINDRA KULKARNI
Digitally signed by PRACHI RAVINDRA KULKARNI
Date: 2025.12.08 12:08:52 +0530

दिनांक – ०६/१२/२०२५

( श्रीमती पी. आर. कुलकर्णी )
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, सांगोला.

**म.सं.कौ.हिं.का. अर्ज क्र. ५२/२०२४ – निशाणी १९ लगत आदेश**

ऋतुजा सुहास तोरणे वि. सुहास भुपाल तोरणे इ.

CNR No. MHSO20-002499-2024

प्रस्तुतचा अर्ज सामनेवाला क्र.४ व ५ तर्फे त्यांचे विरुध्द झालेला एकतर्फा आदेश रद्द होवुन मिळणेसाठी दाखल केलेला आहे. सामनेवाला यांचे कथनाप्रमाणे, प्रस्तुत सामनेवाले हे आजारी असल्याने त्यांना औषधोपचारासाठी जावे लागते. त्यामुळे प्रस्तुत सामनेवाला यांना मे. कोर्टात हजर होवून कागदपत्रे व माहिती घेवून वेळेत प्रस्तुतकामी म्हणणे देता आले नाही. त्यामुळे मे. कोर्टानी सामनेवाला यांचेविरुध्द एकतर्फा आदेश केलेला आहे. प्रस्तुत सामनेवाला यांनी जाणूनबुजून कोणताही विलंब केलेला नाही. तसेच सदर केसचे कामकाज ऑनमेरीट चालणेसाठी व नैसर्गिक न्याय मिळणेच्या दृष्टीने सदरकामी झालेला एकतर्फा आदेश सेट असाईड होणे न्यायाच्या दृष्टीने आवश्यक आहे. यामुळे न्यायदानास मदतच होणार आहे. सबब सामनेवाला यांनी प्रस्तुत अर्जाद्वारे त्यांचे विरुध्द झालेला एकतर्फा आदेश सेट असाईड होणेची व अर्ज मंजूर करणेची विनंती केली.

२. अर्जदार तर्फे सदरच्या अर्जावर म्हणणे मांडले की, सदरचा अर्ज खोटा व लबाडीचा असून सदरचा अर्ज जाणुन बूजून अर्जास विलंब व्हावा या हेतुने दाखल केलेला आहे. तरी सदरचा अर्ज नामंजूर करणेत यावा अशी विनंती केली.

३. दोन्ही पक्षकारांतर्फे युक्तिवाद ऐकला. प्रकरणाचे पडताळणी केली असता सामनेवाला यांना संधी देवूनही त्यांनी त्यांचे म्हणणे मुदतीत न मांडलेमुळे त्यांचे विरुध्द 'विना म्हणणे' आदेश पारित केला आहे. त्यानंतर प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे. महिलांचा घरगुती जुलूमापासून रक्षण करण्यासंबंधीचा कायदा २००५ व नियम २००६, कलम १२ वरील अर्जाची व्याप्ती पाहता तो प्रथमतः

गुणदोषावर निकाली निघणे आवश्यक आहे. अर्जाचे स्वरुप व विषय पाहता सामनेवालाला त्याचे म्हणणे मांडण्याची संधी देणे न्यायाच्या दृष्टीने आवश्यक व गरजेचे आहे. विलंबाचे कारण लक्षात घेता खर्च सामनेवालावर ठेवणे योग्य नाही. वरील सर्व कारणांचा विचार करता खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येतो –

**<u>आ दे श</u>**

१. सामनेवाला क्र.४ व ५ यांचा अर्ज (नि.क्र.१९) मंजूर करणेत येतो.

२. सामनेवाला यांचे विरुध्द झालेला 'एकतर्फा' आदेश रद्द करण्यात येतो.

तसेच दोन्ही पक्षकारांना अर्जाचे कामकाज विनाविलंब चालविण्याचे आदेश देण्यात येत आहे.

PRACHI RAVINDRA KULKARNI
Digitally signed by PRACHI RAVINDRA KULKARNI
Date: 2025.12.08 12:09:00 +0530

दिनांक – ०६/१२/२०२५

( श्रीमती पी. आर. कुलकर्णी )
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, सांगोला.

<u>**C E R T I F I C A T E**</u>

I affirm that the contents of this PDF file Judgment/Order is same word to word as per the original Judgment / Order.

| | | | |
|---|---|---|---|
| (a) | Name of Stenographer | : | Shri. S. S. Patne |
| (b) | Court | : | Smt. P. R. Kulkarni,<br>Civil Judge, J. D. &<br>J.M.F.C. Sangola |
| (c) | Judgment /Order signed by P.O. on | : | 06/12/2025 |
| (d) | Judgment /Order uploaded on | : | 08/12/2025 |